Tele- 7249250184/2120

AIT/0323/CNO/Prin

25 Mar 2021

**OFFICE OF PRINCIPAL**

**NO PUBLIC CELEBRATION**

1. With reference to Order No. 325/2021 dated 24 Mar 2021 of District Collector, Pune.

2. No public celebration of Holi and any other function will be carried out in AIT premises

3. All student and resident of Campus should take note accordingly.

(Dr. B. P. Patil)
Principal

**Copy to:**

Director
Jt Director } For information please.

HOD (Mech)
HOD (E&TC)
HOD (Comp)
HOD (IT)
HOD (ASGE) } Forward to all staff member and Students.

All Hostel

HOD IT - Publish on AIT Website

TRANSLATION VERSION

# Office of Collector Pune District

## (Home Dept.)

**Subject: - Ban on celebration of Holi & Dhuliwandan festival due to Covid-19 Pendamic**

Order:-

The number of Covid-19 patients is increasing in the state and Pune District. Considering that the pendamic may spread rapidly, it is must to restrict its spreading immediately & therefore use precautionary measures.

Considering this, it has became inevitable & urgent to ban the celebrations of the Holi & Dhuliwandan festivals at common places, societies, hotels, resorts, halls, on open play ground , societies open places etc.

Therefore I, Dr Rajesh Deshmukh, Collector Pune District & President Disaster Management, Pradhikaran Pune, under my authority, hereby order that celebrations of the Holi (on 28/03/2021) & Dhuliwandan on (29/03/2021) festivals at common places, societies, hotels, resorts, halls, on open play ground , societies open places etc. is not allowed.

It is requested that the citizens will follow & help to keep under control the spreading of Covid-19 pendamic .

Anyone found violating any of these orders, will be liable for action under Disaster Management Law 2005. These order issued today 24/03/2021.

(Dr Rajesh Deshmukh)
Collector
Pune District & President
Disaster management
pradhikaran , Pune

महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

(गृह शाखा)

दुरध्वनी क्र.०२०-२६१३००९७

E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा : १. भारतीय साथ रोग अधिनियम १८९७

२. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.

३. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. आ.व्य.प्र.-२०२०/प्र.क्र.९२/आव्याप्र-१, दि.२४/१२/२०२०

४. या कार्यालयाकडील आदेश क्र. जि.का./आ.व्या./कावि/२४२/२०२१, दि.१२/०३/२०२१.

५. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील क्र. DMU-२०२०/CR.९२, दि.१५/०३/२०२१

क्र.आ.व्य/कावि/३२५/२०२१ दिनांक:- २४/०३/२०२१

विषय:- कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभुमीवर होळी व धुलीवंदन सण / उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्यास मनाईबाबत.

आदेश

ज्याअर्थी, सद्यस्थितीत राज्यात व पुणे जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पुन्हा वाढत असून दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत आहे. कोरोना विषाणूचा (कोविड- १९) संसर्ग व प्रादुभाव झपाटयाने पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, वाचले क्रमांक ३ अन्वये शासन परिपत्रकान्वये जिल्हयातील यात्रा / उत्सव आयोजित करण्यास परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. तरी कोविड-१९ च्या प्रार्दुर्भावाच्या अनुषंगाने सदर संसर्ग वाढत असल्याची बाब विचारात घेता, नागरीकांनी पालन करावयाचे आवश्यक ती मानद कार्यप्रणालीनुसार पुणे जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्रामध्ये साजरे होणारे होळी व धुलीवंदन सण /उत्सव एकत्रित येऊन सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक व खाजगी मोकळया जागा, सर्व गृहनिर्माण संस्थांमधील मोकळया जागा येथे होळी, धुलीवंदन व रंगपंचमी हे सण / उत्सव साजरे करण्यास मनाई करणे आगत्याचे झाले आहे.

त्याअर्थी, मी डॉ. राजेश देशमुख जिल्हाधिकारी, पुणे तथा जिल्हा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे, मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार वरील प्रमाणे कोविड-१९ च्या प्रार्दुर्भावाच्या अनुषंगाने खबरदारीचे उपाययोजना म्हणून गर्दी टाळण्यासाठी पुणे जिल्हयाचे ग्रामीण कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी, हॉटेल्स, रिसॉर्ट, सार्वजनिक सभागृहे, सार्वजनिक व खाजगी मोकळया जागा, सर्व गृहनिर्माण संस्थांमधील मोकळया जागा येथे दिनांक २८/०३/२०२१ रोजी साजरा होणारा होळी सण/उत्सव तसेच दिनांक २९/०३/२०२१ रोजी साजरा होणारा धुलीवंदन व रंगपंचमी हे सण/उत्सव साजरे करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे पालन करुन नागरीकांनी जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे ही विनंती. सदर आदेशामधील कोणत्याही तरतुदीचा भंग केल्यास संबंतांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व कायदयातील इतर तरतुदीनुसार कारवाई करणेत येईल.

सदरचा आदेश आज दि.२४/०३/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

(डॉ. राजेश देशमुख )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे

प्रत:- १. मा.विभागीय आयुक्त पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त, पुणे / पिंपरी चिंचवड यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी
४. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित
५. सर्व उपविभागीय अधिकारी,सर्व तहसिलदार, सर्व गटविकास अधिकारी यांचेकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद, नगर पंचायत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७. मुख्य कार्याकारी अधिकारी, छावणी परिषद, पुणे/ खडकी/ देहूरोड आवश्यक त्या कार्यवाहीसाठी